भोंडला

भोंडला हा महाराष्ट्रातील स्त्रीया व मुलींचा आवडता सण आहे. भोंडला, भुलाई, हादगा अशा वेगवेगळ्या नावांनी हा सण ओळखला जातो. नवरात्रीच्या १ ल्या दिवसापासून साधारण कोजागिरी पौर्णिमेपर्यंत हा भोंडला चालतो.


लहानपणी वाड्यात असताना भोंडला खूप जोरात असायचा. पाटावर हत्तीचे चित्र काढून त्याची पुजा केली जाई. नंतर वाड्यातील मुली, स्त्रिया व लहान मुले त्या भोवती फेर धरून भोंडल्याची पारंपारीक गिते म्हणत असु. वाड्यात २५, ३० मुली होत्या. त्यामुळे रोज २, ३ जणींकडे तरी भोंडला असायचा. त्यानंतर भोंडल्याची खिरापत ओळखणे हा खूप आवडता खेळ होता. खूपच मजा यायची.

भोंडल्याची गाणी पण खूप वेगळ्या प्रकारची असंत. भोंडल्याची सुरूवात श्री गणेशाच्या ऐलमा पैलमा गणेश देवा ह्या गीतापासून होऊन, एक लिंबु झेलु, कारल्याचा वेल, श्रीकांता कमळकांता,

सासूरवासी सून रूसुन बसली कैसी, नणंद भावजय दोघीजणी, अशी १०,१५ गाणी व शेवटी आड बाई अडोणी... आडात पडला शिंपला आणि आमचा भोंडला संपला. असा जोरदारपणे भोंडला गीतांचा शेवट व्हायचा. खिरापतीला काय ग? असे म्हणून खिरापती ओळखण्याचा कार्यक्रम असायचा. आता तो वाडाही काळाआड गेला व ते बालपणही

आता आम्ही मोठ्या सोसायटीत रहातो. तेथेही आम्ही गाण्यात थोडा बदल करून भोंडला करतो. श्री सूक्त पठण करतो. गरबा, दांडियाचा आनंद घेतो.

नवरात्रीचा सण प्रामुख्याने महिलांचा आहे. स्त्रीशक्ती म्हणजे खांद्याला खांदा लावून उभं राहाता येणं. ऑफिस, घर, समाजात वावरताना महिलांना सन्मानाने वागवलं जाणं, अशा ठिकाणी त्यांना सुरक्षित वाटायला हवं. मोकळेपणाने व्यक्त होता आले पाहिजे. असा समाज तयार व्हायला हवा.



सौ. प्रिती लकडे
औंध. पुणे